**L. A. BILL No. XXV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY ACT, 1998.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९९८ चा महा. १७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९९८ चा महा. १७.

(अ) खंड (१) च्या अगोदर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(अ-१) "संलग्न महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाकडून संलग्नता देण्यात आलेले महाविद्यालय ;";

(ब) खंड (११) मधील, "घटक महाविद्यालय" या मजकुराऐवजी "घटक महाविद्यालय किंवा संलग्न महाविद्यालय" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(अ) खंड (तेरा) व (चौदा) याऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(तेरा) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानसभेचे तीन सदस्य.

(चौदा) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीने नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे दोन सदस्य.";

(ब) खंड (एकोणीस) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(वीस) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अशासकीय सदस्यांमधील एक सदस्य.";

(२) पोट-कलम (२) मधील,—

(अ) खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(अ) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षाने किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा, महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य, किंवा यथास्थिति, महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.";

(ब) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क- १) महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अशासकीय सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला सदस्य, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचा सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.".

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २७ ची सुधारणा.

(अ) खंड (अकरा) मधील, "मान्यता" या मजकुराऐवजी, "संलग्नता किंवा मान्यता" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (बारा) मधील, "व मान्यताप्राप्त संस्थांतील" या मजकुराऐवजी, "संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त संस्थांतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) खंड (पंधरा) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(पंधरा) संलग्न महाविद्यालयांच्या व मान्यताप्राप्त संस्थांच्या तपासणीची व्यवस्था करणे व ती करण्याचा निदेश देणे आणि त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाच्या योग्य सेवा शर्तींची सुनिश्चिती करण्यासाठी अनुदेश देणे आणि अशा अनुदेशांचा अनादर केल्यास, अशा बाबतीत, त्यांच्या संलग्नतेच्या किंवा मान्यतेच्या शर्तीमध्ये फेरबदल करण्याची शिफारस करणे, किंवा तिला योग्य वाटतील अशा इतर उपाययोजना हाती घेणे ;" ;

(ड) खंड (सोळा) मधील, "आणि मान्यताप्राप्त संस्था" या मजकुराऐवजी, ", संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (आठ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(आठ-अ) महाविद्यालयांना संलग्नता व संस्थांना मान्यता देण्यासाठी विनियम करणे ;".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (पाच) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(पाच) कुलगुरुने नामनिर्देशित करावयाचा, संबंधित विद्याशाखेतील संलग्न महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त संस्थेचा एक प्राचार्य किंवा सहयोगी अधिष्ठाता ;".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, खंड (ह) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ह) संलग्न महाविद्यालयांतील, घटक महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त संस्थांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, संशोधन सहायक, पशुवैद्यकीय अधिकारी, क्षेत्र प्रयोगनिर्देशक व इतर प्रवर्गातील कर्मचारी यांची पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशांची पद्धती, वेतन, भत्ते व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्यांचे अधिकार ;".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण सहाच्या, "मान्यता" या शीर्षकाऐवजी, "संलग्नता व मान्यता" हे शीर्षक दाखल करण्यात येईल.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या प्रकरण सहाच्या शीर्षकाची सुधारणा.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ मध्ये नवीन कलम ३५अ समाविष्ट करणे.

**९.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण सहामध्ये, अशा प्रकारे दाखल केलेल्या "संलग्नता व मान्यता" या शीर्षाखालील कलम ३६ च्या आधी, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाविद्यालयांची संलग्नता.

"**३५अ.** (१) विद्यापीठाने विहित केलेल्या आवश्यक शर्तीची पूर्तता करण्यास अधीन राहून व राज्य शासनाच्या मान्यतेने, कार्यकारी परिषदेस, विद्यापीठाव्यतिरिक्त समुचित विश्वस्तसंस्थेच्या किंवा सोसायटीच्या व्यवस्थापनाखालील कोणत्याही महाविद्यालयाला किंवा शैक्षणिक संस्थेला, पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञानांमधील पदव्यांसाठी शिक्षण व संशोधनाची साधने पुरविण्याच्या प्रयोजनार्थ, संलग्न महाविद्यालय म्हणून संलग्नता देण्याचा अधिकार असेल.

(२) या कलमान्वये संलग्नता देण्याची मागणी करणारे नवीन महाविद्यालय किंवा संस्था, कुलसचिवाकडे अर्ज करील आणि पुढील बाबींच्या संबंधात संपूर्ण माहिती देईल :—

(अ) व्यवस्थापक मंडळाची रचना व त्यातील कर्मचारी वर्ग ;

(ब) ज्या विषयांच्या व पाठ्यक्रमांच्या संबंधात संलग्नतेची मागणी केली आहे ते विषय व पाठ्यक्रम ;

(क) जागा, साधनसामग्री व ज्यांच्यासाठी तरतूद करण्यात आली आहे किंवा तरतूद करण्याचे योजिलेले आहे त्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्या शैक्षणिक अर्हता व वेतने आणि त्यांनी केलेले संशोधन कार्य ;

(इ) आकारण्याचे योजिलेली फी ;

(फ) इमारती, जमीन व साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी आणि संस्थेच्या नियमित देखभालीसाठी व तिच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेली वित्तीय तरतूद ;

(ग) पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या बाबतीत, भारतीय पशुचिकित्सा परिषदेने (व्हीसीआय) आणि दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र व मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या बाबतीत, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने (आयसीएआर) विहित केलेल्या पायाभूत सुविधा व मनुष्यबळ यांची उपलब्धता ;

(ह) विद्यापीठाद्वारे विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही आवश्यकता.

(३) पोट-कलम (२) खालील अर्ज मिळाल्यावर, कार्यकारी परिषद,—

(अ) पुढील सदस्यांचा समावेश असलेल्या समितीद्वारे स्थानिक चौकशी करण्याचा निदेश देईल :—

(एक) शिक्षण संचालक - अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाचा, कार्यकारी परिषदेचा एक अशासकीय सदस्य - सदस्य ;

(तीन) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाचा, कार्यकारी परिषदेचा एक शासकीय सदस्य - सदस्य ;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील ;

(क) असा अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर किंवा नामंजूर करण्याची शिफारस करता येऊ शकेल किंवा कसे या प्रश्नाबाबत, विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, खंड (अ) व (ब) अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे निष्कर्ष नमूद करून, आपले मत नोंदवील.

(४) (एक) कार्यकारी परिषदेस समितीच्या व विद्यापरिषदेच्या शिफारशीवरून, प्रस्तावित महाविद्यालयाच्या संलग्नतेचा प्रस्ताव, राज्य शासनाकडे पाठवता येईल.

(दोन) राज्य शासन, कार्यकारी परिषदेने पाठविलेल्या प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, संलग्नता देऊ शकेल किंवा नाकारू शकेल.

(तीन) राज्य शासनाकडून, ज्या महाविद्यालयाला किंवा संस्थेला संलग्नता देण्यात आलेली आहे त्या महाविद्यालयाची किंवा संस्थेची, भारतीय पशुचिकित्सा परिषदेकडून, किंवा यथास्थिति, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून मान्यता मिळविण्याची जबाबदारी असेल. मान्यतेचे प्रस्ताव, भारतीय पशुचिकित्सा परिषदेकडे, किंवा यथास्थिति, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडे सादर करण्यासाठी विद्यापीठामार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील. वेळोवेळी, भारतीय पशुचिकित्सा परिषदेची, किंवा यथास्थिति, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेची, मान्यता चालू ठेवणे ही संलग्न महाविद्यालयाची जबाबदारी असेल.

(चार) भारतीय पशुचिकित्सा परिषदेने किंवा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने मान्यता दिल्यावर, महाविद्यालय हे, संलग्न महाविद्यालय असेल आणि ते विद्यापीठाच्या पर्यवेक्षणाखाली असेल. ".

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये,— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मधील, "मान्यताप्राप्त संस्था" या मजकुराऐवजी, "संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (३) मधील, "मान्यताप्राप्त संस्थेस" या मजकुराऐवजी, "संलग्न महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त संस्थेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ नंतर, पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ मध्ये नवीन कलम ३७अ समाविष्ट करणे.

संलग्नता काढून घेणे.

"**३७अ.** (१) एखाद्या महाविद्यालयाने, कलम ३५अ च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा त्याच्या संलग्नतेच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान शिक्षणाच्या हितांस बाधा येईल अशा रीतीने ते चालविण्यात येत असेल तर विद्यापीठास, संलग्नतेमुळे अशा महाविद्यालयास प्रदान केलेले हक्क विद्यापीठाकडून पूर्णतः किंवा अंशतः काढून घेता येतील किंवा त्यात फेरबदल करता येतील.

(२) अशा रीतीने हक्क काढून घेण्याचा किंवा त्यात फेरबदल करण्याचा प्रस्ताव, फक्त विद्यापरिषदेतच मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला विद्यापरिषदेचा सदस्य, त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांसाठी तो मांडण्यात आला आहे ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, विद्यापरिषद, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची प्रत व कारणांच्या निवेदनाची प्रत, संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यास किंवा सहयोगी अधिष्ठात्यास पाठवील आणि त्यासोबत सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत महाविद्यालयाच्या वतीने सादर केलेले कोणतेही लेखी अभिवेदन विद्यापरिषदेकडून विचारात घेण्यात येईल, अशी सूचना पाठवील :

परंतु, अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेला कालावधी, आवश्यक असेल तर, विद्यापरिषदेस वाढविता येईल.

(४) अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर, विद्यापरिषद, प्रस्तावाची नोटीस, कारणांचे निवेदन व अभिवेदन विचारात घेतल्यानंतर आणि विद्यापरिषदेने,

या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, तिला योग्य वाटेल अशी तपासणी करवून घेतल्यानंतर या बाबतीत हाती घ्यावयाच्या कारवाईचा विचार करील. जर संलग्नता पूर्णतः किंवा अंशतः काढून घेण्याची कारवाई करावी असे विद्यापरिषदेस वाटत असेल तर, विद्यापरिषद, त्या प्रयोजनार्थ ठराव संमत करील व त्यामध्ये, संलग्नता काढून घेण्याची कारणे नमूद करील, आणि तशा अर्थाची शिफारस, कार्यकारी परिषदेकडे करील.

(५) विद्यापरिषदेकडून अशी शिफारस प्राप्त झाल्यावर, कार्यकारी परिषदेला, तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, संलग्नता काढून घेण्यात यावी किंवा कसे आणि ती पूर्णतः किंवा अंशतः काढून घेण्यात यावी किंवा कसे याबाबत निर्णय घेता येईल आणि राज्य शासनाकडे तशी शिफारस करता येईल आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(६) राज्य शासन, जर संलग्नता काढून घेण्याचे किंवा त्यात फेरबदल करण्याचे ठरवील तर, त्याचा निर्णय, लवकरात लवकर, विद्यापीठास, संबंधित महाविद्यालयास आणि केंद्र सरकारच्या समुचित प्राधिकरणास व भारतीय पशुचिकित्सा परिषदेस किंवा, यथास्थिति, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेस कळवील.".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ६३ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ मधील,—

(अ) "घटक महाविद्यालय" या मजकुराऐवजी, "घटक महाविद्यालय, संलग्न महाविद्यालय" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) समास टिपेमधील, "घटक महाविद्यालय" या मजकुराऐवजी, "घटक महाविद्यालय, संलग्न महाविद्यालय" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५. ]**

**[ महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई